# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा क्र. तंशिविकापु/विवि/२०१९/ ३७०५ दिनांक२६/७/२०१९

प्रति,

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,

सर्व सार्वजनिक न्यास/व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था,

पुणे विभाग पुणे,

**विषय :- उद्योगधंदे-संस्था समन्वय परिषद २०१९**

**महोदय,**

सद्यपरिस्थिती मध्ये सर्वच व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था अत्यंत कठीण परिस्थितीतून पुढे जात आहेत. ब-याच संस्थांमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकांप्रमाणे सुसज्य भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. त्याच प्रमाणे शिक्षक व शिक्षकेत्तर पदे सुध्दा नियमाप्रमाणे भरलेली आहेत. परंतु जागतिक मंदीमूळे विद्यार्थी मिळणे दूरापास्त झालेले आहे. त्यामूळे अशा महाविद्यालयांमध्ये कर्मचा-यांचे वेतन व इतर खर्चसुध्दा भागवणे कठिण झालेले आहे व आजही होत आहे.

या सर्व परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी व उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळ याचा पुरेपुर वापर करुन सर्व संस्था स्वंयनिर्भर करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी सूचना मा.डॉ अभय वाघ, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी केलेली आहे. त्यास अनुसरुन आज मितीस सर्व संस्थानी आपल्या जवळच्या औद्योगिक क्षेत्राशी समन्वय व सुसंबंध प्रस्थापित करुन, त्यांचा संस्थांना जास्तीत जास्त उपयोग कसा होईल यावर विचार मंथन करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांची याबद्दलची प्रतिक्रिया/अभिप्राय **दिनांक १५/०४/२०१९ पर्यंत** सहसंचालक कार्यालयाला लेखी स्वरुपात कळविणे बाबत या कार्यालयाने यापुर्वी आपणांस सुचित केले आहे.

**या अनुषंगाने दिनांक ११/०८/२०१९ रोजी उद्योगधंदे-संस्था समन्वय परिषद मा.ना. विनोदजी तावडे, तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. डॉ अभय वाघ, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्या अध्यक्षतेखाली नियोजित केलेली आहे.**

सदर कार्यशाळेच्या पुर्वतयारी साठी दिनांक ३१/०८/२०१९ रोजी सर्व संस्थांचे अध्यक्ष व संचालक/प्रायार्य यांची बैठक दिनांक ३१/०७/२०१९ रोजी दुपारी ३:०० वाजता के.जे.कॉलेज ऑफ इंजिनिअरींग कोंढवा पुणे येथे आयोजित केलेली असून सर्व संबंधितांनी बैठकीस न चुकता हजर रहावे.

( प्रा.चंद्रकांत तुकाराम कुंजीर )

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.